महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा.क्र. : तंशिविकापु/विवि/बीबीए-बीसीए प्रवेश गुणवत्ता यादी तपासणी २०२४-२५/२०२४/ 4807    दिनांक : 10 DEC 2024

**महत्वाचे परिपत्रकः**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित,
विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था
**बीबीए-बीसीए** पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी बीबीए-बीसीए अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश गुणवत्ता याद्या पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...**

**संदर्भ : महाराष्ट्र राज्य विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ दि. १७.०८.२०१५.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संचालनांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेली आहे. महाराष्ट्र राज्य विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता या विभागीय कार्यालयाच्या सर्व अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यतेची तपासणी करण्याकरीता सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना प्राधिकृत केले आहे.

या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या जिल्ह्यांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी बीबीए-बीसीए अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडलेल्या यादीनुसार **आपल्या जिल्ह्यातील तपासणी केंद्रावर** जाऊन करावयाची आहे.

या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील बीबीए-बीसीए अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, तपासणी केंद्रांकडील तपासणी वेळापत्रक / संस्थेस वाटप केलेले तपासणी अधिकारी यांची यादी या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. **आपल्या जिल्ह्यातील तपासणी केंद्रांद्वारे** प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार अथवा तपासणी केंद्राद्वारे आपल्या संस्थेस वाटप केलेल्या तपासणी अधिका-यास संपर्क करुन प्रवेश प्रक्रियेसंदर्भात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा तपासणी केंद्रात उपस्थित रहावे. सदर तपासणीसाठी उमेदवारांची सर्व आवश्यक मुळ कागदपत्रांसोबत Receipt cum Acknowledgment of confirmation of admission (Institute Reporting) ची प्रत घेऊन यावे. तसेच प्रवेश यादी पडताळणीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील आपल्या संस्थेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची प्रत १ प्रतीत (प्राचार्यांचे नाव व स्वाक्षरी, शिक्क्यासह) घेऊन यावे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्विकारली जाणार नाही.

सर्व संस्थांनी नेमून दिलेल्या दिवशी या तपासणी केंद्रांकडून आपली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व त्यांची मुळ कागदपत्रे तपासून घेतल्यानंतर, पुढील पडताळणी व या विभागीय कार्यालयाकडून तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करणेकरिता स्वतंत्र वेळापत्रक या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल. पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या (पडताळणी प्रमाणपत्रासह) संस्थांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे विहीत

कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. विहीत कालावधीत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या (पडताळणी प्रमाणपत्रासह) प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडे सादर न केल्यास संस्थांना दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे सूचनेनुसार सदर प्रवेश याद्या ऑनलाईनरित्या सुध्दा सादर करणे आवश्यक आहे. त्याबाबत आपणांस परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २००५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारीत झालेले प्रवेश नियम/शासन निर्णय/अधिसुचना/न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई या कार्यालयास विहीत कालमर्यादेत सादर न झाल्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना (प्रवेशांना) प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

सोबतः वेळापत्रक

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

२/२

गुणवत्ता यादी प्रमाणपत्र/गुणपत्रिका तपासणी ज्या ठिकाणी करावयाची अशा कार्यालयाची/संस्थांची यादी.

| अ.क्र. | गुणवत्ता यादी (प्रमाणपत्र/गुणपत्रिका) तपासणी करणारी संस्था | संस्थांचे जिल्हे |
|---|---|---|
| १ | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | **पुणे** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | **सातारा** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | **सांगली** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | **सोलापूर** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | **कोल्हापूर** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |